ePaper
राहुल गांधींची खासदारकी रद्द करा! भाजपा खासदाराचा लोकसभेत प्रस्ताव



वर्ष - 9 । अंक - 168 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™



पान 2 वरुन...
महापौर मंजूषा नागपुरे ॲक्शन मोडवर!

WWW.MAHAENEWS.COM | शुक्रवार, दि. 13 फेब्रुवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## ११४ राफेल लढाऊ विमाने- 'P8I' विमानांच्या खरेदीला मंजुरी

# हिंदुस्थानचे हवाई सामर्थ्य!



**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखालील संरक्षण अधिग्रहण परिषदेने गुरुवारी तिन्ही सशस्त्र दलांसाठी विविध अधिग्रहण प्रस्तावांना मंजुरी दिली. उच्च अधिकाऱ्यांनी द इंडियन एक्सप्रेसला दिलेल्या माहितीनुसार, यामध्ये फ्रान्सकडून ११४ राफेल लढाऊ विमाने खरेदी करण्याच्या कराराचाही समावेश आहे.**

संरक्षण अधिग्रहण परिषदेने अमेरिकेकडून सहा पी-८आय (P-8I) सागरी देखरेख आणि पाणबुडीविरोधी युद्ध विमानांच्या खरेदीलाही मान्यता दिली आहे. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या १७ ते १९ फेब्रुवारी दरम्यान भारत दौऱ्यावर येणार आहेत. त्यांच्या भारत दौऱ्याच्या काही दिवस आधी ही मंजुरी देण्यात आली आहे. उच्च अधिकाऱ्यांनी द इंडियन एक्सप्रेसला सांगितले की, ११४ राफेल लढाऊ विमानांपैकी ९० विमाने स्वदेशी पद्धतीने तयार करण्याची योजना आहे, ज्यामध्ये अंदाजे ५० टक्के स्वदेशी सामग्री असेल.

यापूर्वी भारतात उत्पादित होणाऱ्या विमानांमध्ये ३० टक्के स्वदेशी सामग्रीचा वापर करण्याची चर्चा झाली होती. पण अधिकाऱ्यांनी गुरुवारी सांगितले की, पुढील चर्चेत हे प्रमाण सुमारे ५० टक्क्यांपर्यंत वाढवले जाईल. शिवाय, विमानांवर भारतीय शस्त्रे आणि प्रणाली बसवण्याचे पूर्ण अधिकार भारताला असतील. व्यावसायिक वाटाघाटी पूर्ण झाल्यानंतर आणि सुरक्षा मंत्रिमंडळ समितीने अधिग्रहणाला मान्यता दिल्यानंतर अंतिम करारावर स्वाक्षरी केली जाईल.

भारतीय हवाई दलाकडे आधीच ३६ राफेल विमाने आहेत आणि भारतीय नौदल पुढील काही वर्षांत २६ राफेल एम विमाने वाहक ऑपरेशन्ससाठी समाविष्ट करेल.

राफेल विमानांच्या खरेदीमुळे लॉजिस्टिक्स आणि प्रशिक्षण खर्च कमी होण्यास मदत होईल.

## सहा पी-८आय विमान खरेदीला पुन्हा गती



संरक्षण अधिग्रहण परिषदेने अमेरिकेकडून सहा पी-८आय सागरी देखरेख आणि पाणबुडीविरोधी युद्ध विमानांच्या खरेदीलाही मान्यता दिली आहे. नोव्हेंबर २०१९ मध्ये संरक्षण अधिग्रहण परिषदेने सहा पी-८आय विमानांच्या खरेदीला मान्यता दिली होती. त्यानंतर अमेरिकेच्या संरक्षण विभागाने एप्रिल २०२१ मध्ये अंदाजे २.४२ अब्ज डॉलर्स किमतीच्या विक्रीला मान्यता दिली. पण हा करार आतापर्यंत होऊ शकला नाही. आता विमानाच्या किमतीत लक्षणीय वाढ होण्याची अपेक्षा आहे. भारत आणि अमेरिका गेल्या काही महिन्यांपासून या कराराच्या तपशीलांवर चर्चा करत असून पुन्हा प्रयत्न सुरू केले आहेत. गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये अमेरिकेच्या संरक्षण विभागाचे आणि बोईंगच्या अधिकाऱ्यांचे एक शिष्टमंडळ या संदर्भात भारतात आले होते. गेल्या महिन्यात भारतातील अमेरिकेचे राजदूत सर्जियो गोर यांनी एका अमेरिकन शिष्टमंडळासह संरक्षण सचिव आर. के. सिंग यांची भेट घेतली होती.

# महापौर मंजूषा नागपुरे ॲक्शन मोडवर!

## पूरधोका टाळण्यासाठी एप्रिलअखेर नालेसफाई पूर्ण करण्याचे निर्देश

**महाईन्यूज । पुणे**

**'पावसाळ्यातील संभाव्य पूरस्थिती टाळण्यासाठी शहरातील नालेसफाईची कामे एप्रिल महिन्याअखेरपर्यंत पूर्ण करावी आणि त्याचा दैनंदिन अहवाल महापौर कार्यालयाला द्यावा,' असा आदेश महापौर मंजूषा नागपुरे यांनी दिले आहेत. नालेसफाईच्या कामात दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला आहे.**



गेल्या काही वर्षातील अतिवृष्टीचा अनुभव घेता शहरातील काही भागांत आणि नदीकाठच्या वस्त्यांमध्ये पुराचा धोका अधिक असतो. प्रशासनाने अशा 'पूरप्रवण' ठिकाणांची यादी अद्ययावत करून तिथे पाणी साचू नये म्हणून आतापासूनच 'पंपिंग स्टेशन' आणि आवश्यक उपाययोजना सज्ज ठेवाव्यात, असे या आदेशात नागपुरे यांनी नमूद केले असून, येत्या काही दिवसांमध्ये पूरपरिस्थिती उद्भवणाऱ्या भागांची पाहणी त्या करणार आहेत. 'नदीसुधार प्रकल्पाच्या सध्याच्या प्रगतीचा आणि पावसाळ्यातील सुरक्षेचा सविस्तर अहवाल महापौर कार्यालयाला सादर करावा. पावसाळ्यात रस्ते निसरडे होऊन अपघात टाळण्यासाठी नवीन खोदकामास परवानगी देण्याची तारीख निश्चित करावी. शहरात सुरू असलेली कामे तत्काळ पूर्ण करून रस्ते पूर्वस्थितीत आणावेत,' अशी सूचनाही नागपुरे यांनी केल्या असून, या संदर्भात लवकरच बैठक घेण्यात येणार आहे.

वरं जनहितं ध्येयम्
पुणे महानगरपालिका

### उपमहापौरांकडून प्रभागाची पाहणी

पुरंदर विमानतळ भूसंपादनासाठी अधिसूचना जारी झाल्यानंतर शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर विरोध दर्शवित आंदोलन केले होते. आंदोलन चिघळल्यामुळे गेल्या वर्षी पोलिसांकडून आंदोलकांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मध्यस्थीनंतर शेतकऱ्यांवरील गुन्हे मागे घेण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्यानुसार हे गुन्हे मागे घेण्यास राज्य सरकारने मान्यता दिली. आता ही गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया नियमानुसार सुरू करण्यात आली आहे.

### रस्ते खोदकामावर नियंत्रण

'पावसाळ्यात निसरडे रस्ते आणि अपघात टाळण्यासाठी नवीन खोदकामास परवानगी देण्याची अंतिम तारीख निश्चित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सध्या सुरू असलेली सर्व कामे तातडीने पूर्ण करून रस्ते पूर्ववत करावेत,' असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# लाँड्री व्यावसायिकाची 1 कोटी १५ लाखांची फसवणूक

**महाईन्यूज । पुणे**

**शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने एका लाँड्री व्यावसायिकाची सायबर चोरट्यांनी एक कोटी १५ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



याबाबत एका लाँड्री व्यावसायिकाने सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, सानिया गोखले असे नाव सांगून फसवणूक करणारी महिला, तसेच विविध बँक खातेधारकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार ४८ वर्षीय लाँड्री व्यावसायिक पर्वती गावातील लक्ष्मीनगर भागात राहायला आहेत. त्यांचा लाँड्री व्यवसाय आहे. गेल्या वर्षी सानिया गोखले असे नाव सांगणाऱ्या महिलेने त्यांच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला. शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष दाखविले. त्यांना शेअर बाजारातील विविध गुंतवणूक योजनांची माहिती देऊन समाज माध्यमातील एका समुहात सहभागी करुन घेतले.

गेल्या चार ते पाच महिन्यात लाँड्री व्यावसायिकाने वेगवेगळ्या बँक खात्यात एक कोटी १५ लाख ११ हजार ६०० रुपये जमा केले. पैसे जमा केल्यानंतर त्यांना परतावा मिळाल्याचे भासविण्यात आले. तसा संदेशही पाठविण्यात आला. मात्र, प्रत्यक्षात त्यांना परतावा देण्यात आला नाही. फसवणूक झाल्याचे उघडकीस आल्यानंतर लाँड्री व्यावसायिकाने नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली. पोलीस निरीक्षक संगीता देवकाते तपास करत आहेत.

### वाहतूक नियमभंगाचे बनावट चलन पाठवून फसवणूक



प्रादेशिक परिवहन विभागाकडून (आरटीओ) वाहतूक नियमभंग करण्यात आल्याचे बनावट चलन पाठवून एकाची दोन लाख ९५ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका ४८ वर्षीय तक्रारदाराने मार्केट यार्ड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार व्यावसायिक मार्केट यार्डातील गंगाधाम परिसरात राहायला आहेत. सायबर चोरट्यांनी त्यांना वाहतूक नियमभंगाचे बनावट चलन एपीके फाईलच्या माध्यमातून पाठविले. या बनावट चलनावर आरटीओचा उल्लेख असल्याने व्यावसायिकाने संबंधित फाईल उघडली. सुरुवातीला चोरट्यांनी त्यांना छोटी रक्कम पाठविण्यास सांगितले. त्यानंतर बँक खात्याची गोपनीय माहिती घेऊन चोरट्यांनी व्यावसायिकाच्या बँक खात्यातून दोन लाख ९५ हजार रुपयांची रोकड लांबविली. फसवणूक झाल्याचे उघडकीस आल्यानंतर त्यांनी नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नवले तपास करत आहेत. वाहतूक नियमभंगाचे बनावट चलन, थकीत वीज देयक, गॅस देयक पाठवून फसवणूक करण्याचे प्रकार वाढले आहेत.

# पिंपरी-चिंचवडमध्ये प्रतिबंधात्मक आदेश!

## शस्त्र बाळगणे, सभा व मिरवणुकांवर बंदी; उल्लंघन केल्यास कारवाईचा इशारा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**आगामी काळात साजरे होणारे सण, उत्सव, क्रांतिवीर लहुजी साळवे पुण्यतिथी व वासुदेव बळवंत फडके पुण्यदिनाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१)(३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. हे आदेश १७ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत लागू राहतील.**



या आदेशान्वये कोणताही दाहक पदार्थ अथवा स्फोटक पदार्थ, ज्वलनशील द्रव पदार्थ बाळगणे,दगड अथवा शस्त्रे किंवा अस्त्रे, सोडावयाची अस्त्रे किंवा फेकावयाची हत्यारे अगर साधने तसेच काचेचे तुकडे व काचेच्या रिकाम्या बाटल्या बरोबर नेणे, जमा करणे व तयार करणे, शस्त्रे, सोटे, भाले, चाकु, सुरा, कोयता, तलवारी, दंड, काठया, बंदुका व शारीरिक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे, कोणत्याही इसमाचे चित्राचे, प्रतिकात्मक प्रेताचे, पुढाऱ्यांच्या चित्राचे, प्रतिमेचे प्रदर्शन व दहन करणे, मोठमोठयाने अर्वाच्य घोषणा देणे, वाद्य वाजविणे यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहचेल किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा राज्य उलथवून देण्यास प्रवृत्त करेल अशी आवेशपूर्ण भाषणे करणे किंवा आविर्भाव करणे, कोणतेही जिन्नस तयार करून त्याचा जनतेत प्रसार करणे या कृत्यावर बंदी घालण्यात आली आहे.

महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ च्या कलम ३७ चे पोटकलम (३) प्रमाणे पाच किंवा पाच पेक्षा जास्त लोकांचा जमाव करण्यास तसेच पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचे पुर्व परवानगी शिवाय सभा घेणेस किंवा मिरवणूक काढण्यास बंदी मनाई राहील. वरील आदेश हा शासनाच्या सेवेतील व्यक्तींना व ज्यांना आपल्या वरिष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्यपुर्तीसाठी हत्यार बाळगणे आवश्यक आहे त्यांना लागू होणार नाही. या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधीत व्यक्ती महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन-१९५१ चे कलम १३५ प्रमाणे शिक्षेस पात्र होईल, असे पिंपरी चिंचवड पोलीस सह आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर यांनी कळविले आहे.

# “शिवगर्जना”द्वारे छत्रपती शिवाजी महाराज विचार प्रबोधन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त १५ ते १९ फेब्रुवारी दरम्यान ‘विचार प्रबोधन पर्वा’चे आयोजन करण्यात आले आहे. शिवरायांच्या विचारांचे, पराक्रमाचे आणि सुशासनाच्या तत्त्वांचे स्मरण करून नव्या पिढीला प्रेरणा देण्याच्या उद्देशाने या पर्वाचे आयोजन करण्यात आले आहे.**



> “ छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आणि कर्तृत्व हे प्रत्येक पिढीसाठी मार्गदर्शक आहेत. महापालिकेच्या वतीने आयोजित विचार प्रबोधन पर्वाच्या माध्यमातून शिवरायांचे जीवनकार्य आणि स्वराज्याचा संदेश शहरवासियांपर्यंत पोहोचविणे हा हेतू असून ‘शिवगर्जना’ या भव्य महानाट्याचा लाभ नागरिकांनी कुटुंबासह उपस्थित राहून घ्यावा आणि शिवरायांच्या विचारांपासून प्रेरणा घ्यावी.
>
> **- रवि लांडगे,** महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

या पर्वाअंतर्गत निगडी येथील नियोजित महापौर निवास परिसरात १७, १८ व १९ फेब्रुवारी २०२६ रोजी ‘शिवगर्जना’ या भव्य महानाट्याचे सादरीकरण करण्यात येणार आहे. मा. राष्ट्रपती महोदय यांच्या समोर सादर झालेल्या या भव्य महानाट्यप्रयोगामध्ये सुमारे २५० हून अधिक कलाकारांचा सहभाग असून घोडे,उंट तसेच आकर्षक नेपथ्य,नेत्रदीपक अतिषबाजी, प्रकाशयोजना व ध्वनीसंयोजनाच्या माध्यमातून शिवचरित्रातील महत्त्वपूर्ण प्रसंग प्रभावीपणे उभे करण्यात येणार आहेत.महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते १७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६.३० वाजता या महानाट्याचा शुभारंभ होणार आहे.

‘शिवगर्जना’ या महानाट्यात शिवाजी महाराज यांच्या जन्माआधीचा काल, छत्रपती शिवाजी महाराजांचे बालपण, संत तुकाराम महाराज आणि शिवाजी महाराज यांची भेट (भक्ती शक्ती भेट), तोरणा विजय,स्वराज्य स्थापनेचा संघर्ष, शेतकऱ्यांसाठीचे आज्ञापत्र, प्रतापगड मोहीम, पन्हाळगड वेढा आणि सुटका, स्वराज्य आरमार उभारणीचा प्रसंग, पुरंदरचा तह, आग्रा भेट, नरवीर तानाजी मालुसरे यांचा कोंढाणा जिंकण्याचा प्रसंग आणि नेत्र सुखद करणारा भव्य दिव्य शिवराज्याभिषेक सोहळा यांसारखे ऐतिहासिक प्रसंग सजीव स्वरूपात सादर केले जाणार आहेत. इतिहासाची भव्यता आणि राष्ट्राभिमान जागविणारा हा नाट्यप्रयोग नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

या कार्यक्रमास केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांची विशेष उपस्थिती असणार आहे. तसेच राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांची प्रमूख उपस्थिती तसेच खासदार मेधा कुलकर्णी,सुप्रिया सुळे, श्रीरंग बारणे, डॉ.अमोल कोल्हे, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, महेश लांडगे, शंकर जगताप, शंकर मांडेकर, आयुक्त श्रावण हर्डीकर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, उपमहापौर शर्मिला बाबर, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग सदस्य ॲड. गोरक्ष लोखंडे, शहरातील नगरसदस्य, नगरसदस्या तसेच महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे यांची देखील उपस्थिती लाभणार आहे. याशिवाय भक्ती शक्ती शिवजयंती उत्सव समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ज्येष्ठ नागरिक, शिवप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते तसेच मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमस्थळी नागरिकांसाठी बैठक व्यवस्था, वाहतूक नियोजन, सुरक्षा व्यवस्था तसेच आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती महापालिकेच्या वतीने देण्यात आली आहे.

# "रेरा"वर सर्वोच्च न्यायालयाची ताशेरेबाजी !



## भूमिका

**रिअल इस्टेट क्षेत्रातील वाढत्या अनियमितता, विलंबित प्रकल्प, अपूर्ण आश्वासने आणि ग्राहकांची फसवणूक या पार्श्वभूमीवर पारदर्शकता, जबाबदारी आणि ग्राहकांच्या हितसंरक्षणासाठी २०१६ मध्ये रिअल इस्टेट (रेग्युलेशन अँड डेव्हलपमेंट) कायदा 'रेरा' लागू करण्यात आला.**

घर खरेदीदारांच्या दीर्घकाळ चाललेल्या संघर्षानंतर हा कायदा अस्तित्वात आला होता. प्रकल्प पूर्ण होण्यात होणारा विलंब, करारातील एकतर्फी अटी, निधींचा अपव्यय आणि चुकीची आश्वासने यामुळे निर्माण झालेल्या असुरक्षिततेच्या पार्श्वभूमीवर रेरा हा आशेचा किरण ठरला. मात्र, अलीकडे सर्वोच्च न्यायालयाने रेराच्या कार्यप्रणालीवर केलेल्या कठोर निरीक्षणांमुळे या संपूर्ण व्यवस्थेच्या प्रभावीपणावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमालिया बागची यांच्या खंडपीठाने सुनावणीदरम्यान नोंदवलेली टिप्पणी अत्यंत परखड होती. "रेरा जर डिफॉल्टर बिल्डर्सना संरक्षण देण्याचे साधन ठरत असेल, तर तो कायदा टिकवण्याचा अर्थ काय?" असा थेट सवाल न्यायालयाने उपस्थित केला. सर्व राज्यांनी रेराच्या अंमलबजावणीबाबत आत्मपरीक्षण करावे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. ही टिप्पणी केवळ एका प्रकरणापुरती मर्यादित नसून देशभरातील रेरा प्राधिकरणांच्या कामकाजावर प्रकाश टाकणारी आहे.

ही निरीक्षणे हिमाचल प्रदेशातील रेरा कार्यालय सिमला येथून धर्मशाला येथे हलवण्याच्या वादाच्या पार्श्वभूमीवर करण्यात आली. राज्य सरकारने कार्यालय हलवण्याचा निर्णय घेतला होता; मात्र पर्यायी व्यवस्था न करता तो निर्णय घेतल्याने हायकोर्टाने स्थगिती दिली होती. सर्वोच्च न्यायालयाने तो आदेश रद्द करून कार्यालय शिफ्ट करण्यास परवानगी दिली, परंतु "जनतेला कोणताही त्रास होता कामा नये," असे स्पष्ट निर्देश दिले. अपिलीय न्यायाधिकरणही त्याच ठिकाणी हलवण्याचा सल्ला देण्यात आला, जेणेकरून नागरिकांची धावपळ कमी होईल.

रेराचा मूलभूत उद्देश स्पष्ट होता — प्रकल्प नोंदणी अनिवार्य करणे, ग्राहकांकडून घेतलेला निधी स्वतंत्र खात्यात ठेवणे, वेळेत काम पूर्ण करण्याची जबाबदारी निश्चित करणे आणि तक्रारींचे जलद निवारण करणे. सुरुवातीच्या काळात या कायद्यामुळे काही प्रमाणात शिस्त आली; बिल्डर्सना नियमांचे पालन करावे लागले आणि ग्राहकांना अधिक माहिती व संरक्षण मिळाले. परंतु कालांतराने अनेक राज्यांत मनुष्यबळाची कमतरता, अपुरी साधने, नियुक्त्यांतील विलंब आणि राजकीय हस्तक्षेप यांमुळे रेरा प्राधिकरणांची कार्यक्षमता कमी होत गेली.




अनेक प्रकरणांमध्ये तक्रारी वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात. आदेश दिल्यानंतरही त्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नाही. दंडात्मक तरतुदी असूनही डिफॉल्टर बिल्डर्सवर ठोस कारवाई होत नसल्याच्या तक्रारी वारंवार पुढे येतात. काही राज्यांत अपिलीय न्यायाधिकरणे पूर्णवेळ कार्यरत नसतात. परिणामी, ग्राहकांसाठी उभारलेली यंत्रणा अपेक्षित परिणाम देण्यात अपयशी ठरते.

मात्र, या त्रुटींमुळे रेरा संपवणे हा उपाय ठरू शकत नाही. रिअल इस्टेट क्षेत्रात प्रभावी नियमनाची गरज आजही तितकीच महत्त्वाची आहे, कारण या क्षेत्रात नागरिकांची आयुष्यभराची बचत गुंतलेली असते. रेरा नसल्यास पूर्वीची अराजक स्थिती परत येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे रेराचा अंत नव्हे, तर त्याचे सखोल पुनरावलोकन आणि बळकटीकरण आवश्यक आहे.

रेरा प्राधिकरणांची स्वायत्तता वाढवणे, वेळेवर आणि पारदर्शक नियुक्त्या करणे, पुरेसे तांत्रिक व कायदेशीर मनुष्यबळ उपलब्ध करून देणे आणि आदेशांची काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करणे अत्यावश्यक आहे. तक्रारींच्या निपटाऱ्यासाठी निश्चित कालमर्यादा बंधनकारक करावी. केंद्र आणि राज्यांनी समन्वयाने एकसमान, पारदर्शक आणि उत्तरदायी कार्यपद्धती विकसित करणे ही काळाची गरज आहे.

## प्रासंगिक »

### अष्टावक्र ऋषींची शिकवण

***अष्टावक्र हे हिंदू धर्मशास्त्रातील एक महान ज्ञानी ऋषी होते. त्यांच्या शरीराचे आठ ठिकाणी वाकडेपण असल्यामुळे त्यांना 'अष्टावक्र' असे नाव पडले.***

ते दिसायला कुरूप आणि बेढब होते. एकदा ते किशोरवयात राजा जनकाच्या दरबारात गेले. दरबारात विद्वान, पंडित आणि ज्ञानी लोक बसले होते. अष्टावक्र सभेत प्रवेश करताच त्यांच्या विचित्र शरीराकडे पाहून अनेकजण हसू लागले. काहींचे हसू थांबतही नव्हते. हे पाहून अष्टावक्रही मोठ्याने हसू लागले. राजा जनकाने आश्चर्याने विचारले, "हे साधू, सर्वजण तुमच्यावर हसत आहेत, पण तुम्ही का हसता?" त्यावर अष्टावक्र म्हणाले, "मला वाटले येथे ज्ञानी लोक असतील; पण येथे तर बाह्य रूप पाहणारे लोक आहेत. माझ्या शरीराकडे पाहून हसणाऱ्यांची बुद्धी पाहून मला हसू आले." हे ऐकून संपूर्ण सभा लज्जित झाली.


तात्पर्य-
मनुष्याचे खरे महत्त्व त्याच्या बाह्य रूपावर अवलंबून नसून त्याच्या ज्ञान, कष्ट आणि उत्तम कर्मांवर ठरते.

उत्क्रांतीच्या प्रवासात मानवात शिल्लक राहिलेल्या पशुत्वाचे मूर्त रूप म्हणजे जेफ्री एपस्टीन प्रकरण. एपस्टीन ही केवळ व्यक्ती नव्हे; ती एक प्रवृत्ती आहे. ती पाश्चात्त्य, भोगवादी समाजापुरती मर्यादित नाही. अशा विकृती सर्व काळात, सर्व भूभागात दिसतात. आपल्या संस्कृतीतही सत्तेच्या, धर्माच्या किंवा प्रतिष्ठेच्या आड लपलेले शोषण नव्हते असे नाही.

# लैंगिक लाभार्थींचा लेखाजोखा

त्यामुळे मुद्दा एपस्टीनचे कार्यकेंद्र कोणते हा नसून, त्याने केलेल्या कृत्यांची घृणास्पदता आणि त्या उघडकीस आल्यानंतर समाजव्यवस्थेने दिलेली प्रतिक्रिया हा आहे.

लैंगिकता ही परस्परसंमतीने, प्रौढांमध्ये घडणारी बाब असेल तर ती वैयक्तिक क्षेत्रात मोडते. परंतु एपस्टीनचे प्रकरण तसे नव्हते. त्याने अल्पवयीन मुलींना जाळ्यात ओढले, त्यांचे शोषण केले आणि त्यांना प्रभावशाली व्यक्तींशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी चलनासारखे वापरले. हे केवळ वैयक्तिक विकृतीचे नव्हे, तर सत्तेचा, पैशाचा आणि प्रभावाचा दुरुपयोग करणारे अक्षम्य अपराध होते. अशा कृत्यांना मानवतेच्या कोणत्याही निकषांवर माफी नाही.



शिक्षक ते बँकर असा प्रवास करणाऱ्या एपस्टीनने प्रभावशाली वर्तुळांमध्ये प्रवेश मिळवला. दोन दशकांपूर्वी एका पालकाच्या तक्रारीनंतर त्याची कृत्ये उघडकीस येऊ लागली. पुढे 'मी टू' चळवळीच्या पार्श्वभूमीवर अनेक महिलांनी पुढे येत अत्याचारांच्या कथा मांडल्या. राजकारणी, उद्योगपती, बँकर, विद्यापीठीय विद्वान अशा अनेक प्रभावशाली व्यक्तींचा त्याच्याशी संबंध होता. परिणामी संशयाची छाया अनेकांवर पडली. तुरुंगात असताना एपस्टीनने आत्महत्या केल्याची अधिकृत नोंद झाली; परंतु त्यामुळे उलट संशय अधिक गडद झाला. उच्चपदस्थांनी त्याला गप्प केले, अशी वदंता पसरली. काहींचे त्याच्याशी असलेले संबंध उघड झाल्याने अशा शंकांना खतपाणी मिळाले.

परंतु या प्रकरणातील अधिक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे त्यानंतरची संस्थात्मक प्रतिक्रिया. उदाहरणार्थ, इंग्लंडमध्ये काही वरिष्ठ व्यक्तींचे एपस्टीनशी संबंध असल्याचे उघड झाल्यावर त्यांना पदत्याग करावा लागला. नियुक्त्या करताना माहिती असूनही दुर्लक्ष झाले, हे समोर आल्यानंतर जबाबदारी निश्चित करण्यात आली. यातून एक गोष्ट स्पष्ट होते—व्यक्ती चुका करू शकते; परंतु त्या लपवण्याचा प्रयत्न झाल्यास आणि सत्तेच्या बळावर त्यांचे संरक्षण झाले, तर व्यवस्थेची कसोटी लागते.

व्यवस्था असलेला आणि नसलेला समाज यातला फरक याच ठिकाणी दिसतो. प्रभावशाली व्यक्तींनाही प्रश्न विचारणारी यंत्रणा, चौकशीची स्वायत्तता आणि जबाबदारीची जाणीव ही लोकशाहीची खरी ताकद असते. एपस्टीन मेला; परंतु त्याच्या प्रकरणाने सत्ताकेंद्रे, समाज आणि न्यायव्यवस्था यांना आरसा दाखवला. विकृती सार्वत्रिक असू शकते, परंतु तिला उघडे पाडून दोषींना उत्तरदायी धरणारी व्यवस्था हेच सभ्यतेचे खरे लक्षण ठरते.

## ।। अभंगवाणी ।।



सुंदर तें ध्यान उभे विटेवरी ।
कर कटावरी ठेवूनियां ॥१॥

तुळसीचे हार गळां कासे पीतांबर ।
आवडे निरंतर तें चि रूप ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# गुंतवणूकदारांच्या न्यायासाठी खासदार लंके आग्रही

## राज्यांतील आर्थिक गैरव्यवहारांबाबत गृहमंत्री अमित शहांकडे निवेदन

**महाईन्यूज | अहिल्यानगर**

**महाराष्ट्रातील गुंतवणूकदारांच्या कोट्यवधी रुपयांच्या फसवणूक प्रकरणाचा तपास ईडी, सीबीआय यासारख्या केंद्रीय तपास संस्थांमार्फत सखोल चौकशी करून गुंतवणूकदारांना न्याय द्यावा तसेच भविष्यात अशा फसव्या योजनांना आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना कराव्यात अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची दिल्लीमध्ये भेट घेऊन केली आहे.**



खासदार लंके यांनी यापूर्वी पंतप्रधानांच्या भेटीत त्यांना रायगड किल्ल्याच्या भेटीचे निमंत्रण दिले होते. आता गृहमंत्री शहा यांची भेट घेऊन गुंतवणूकदारांच्या समस्यांकडे लक्ष वेधले. नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीत जिल्ह्यातील गुंतवणूकदारांचा प्रश्न प्रचाराचा बनला होता. याच मुद्द्यावरून पालकमंत्री राधाकृष्ण विखे व त्यांचे चिरंजीव माजी खासदार सुजय विखे यांनी खासदार लंके यांचे नाव न घेता त्यांच्याविरुद्ध टीकेची झोड उठवली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही महापालिकेच्या निवडणूक प्रचार सभेत गुंतवणूकदारांच्या फसवणुकीचा तपास सीबीआयकडे सोपवण्यासाठी केंद्रीय गृहमंत्र्यांची भेट घेणार असल्याचे जाहीर केले होते.

खासदार लंके यांनी यासंदर्भात केंद्रीय गृहमंत्री शहा यांना निवेदन दिले. राज्यात गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाली. ज्यादा परताव्याचे आमिष दाखवून नागरिकांकडून गुंतवणूक करून घेतल्यानंतर पैसे परत न देणे, धमकावणे, आर्थिक गैरव्यवहार केल्याचे आरोप संबंधित संस्थांवर आहेत. या प्रकरणाची ईडी, सीबीआय यासारख्या केंद्रीय तपास संस्थांमार्फत सखोल चौकशी करून गुंतवणूकदारांना न्याय द्यावा अशी मागणी करण्यात आली आहे.

याबरोबरच पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधी कार्यालय दिल्लीतील 'सेवा तीर्थ' या नवीन इमारतीत स्थलांतर झाल्यानंतर लोकप्रतिनिधींना तेथे अधिकृत कामासाठी प्रवेश नाकारला जात आहे, त्यामुळे गंभीर आजारी नागरिकांच्या मदत प्रकरणांवर त्याचा प्रतिकूल परिणाम होत आहे. लोकप्रतिनिधींना त्या विभागात प्रवेश देण्याच्या स्पष्ट सूचना द्याव्यात, अशा मागणीची निवेदनही लंके यांनी गृहमंत्र्यांना दिले.

याबरोबरच पुणे येथील गुन्हा शाखेच्या युनिट-१३ (गुप्तचर विभाग) कामकाज न्यायालयाच्या आदेशानुसारही अद्याप सुरू झालेले नाही. तसेच तेथील १७० कर्मचाऱ्यांचे १८ महिन्यांचे वेतन थकीत राहिले आहे. परिणामी त्यांच्या कुटुंबावर गंभीर आर्थिक संकट ओढावले आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार युनिट- १३ चे कामकाज तातडीने सुरू करून सर्व थकीत वेतन अदा करावे, अशीही मागणी खासदार लंके यांनी केली आहे.

# कोल्हापुरात क्रिकेटच्या मैदानात आता मंदिरांचे पुजारीही..!

**महाईन्यूज | कोल्हापूर**

**भारतात क्रिकेट खेळाने आबालवृद्धांना आधीच आकर्षित केले आहे. आता तर क्रिकेट मधील टी ट्वेंटी विश्वचषकाचे सामने रंगात आले आहेत. क्रिकेट हा जणू भारताचा धर्म बनला आहे. आणि धार्मिक अंगाने विचार केला तर यामध्ये मंदिरातील पुजाऱ्यांचे स्थान महत्त्वाचे.**




एरवी मंदिरातील पुजारी हाती घंटा, पळी-पात्र, पूजेची सामुग्री घेऊन धार्मिक विधी करताना दिसतात. पण आता याच पुजाऱ्यांच्या हाती बॅट आणि चेंडू दिसणार आहेत. कोल्हापूरसह राज्यातील विविध मंदिरांतील पुजारी, श्रीपूजक आणि देवस्थान कर्मचारी १४ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या 'मंदिर प्रीमियर लीग' या अनोख्या क्रिकेट स्पर्धेसाठी सज्ज झाले आहेत. धार्मिक सेवेसोबतच क्रीडाक्षेत्रातही आपली क्षमता सिद्ध करण्यासाठी पुजारी बांधव मैदानात उतरणार असल्याने या स्पर्धेबाबत विशेष उत्सुकता निर्माण झाली आहे.

महाराष्ट्राच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परंपरेमध्ये मंदिरांचे तसेच पुजाऱ्यांचे स्थान अत्यंत मानाचे आहे. समाजाला अध्यात्मिक दिशा देणारे हेच पुजारी बांधव आता एकत्र येऊन क्रीडामाध्यमातून संघटन, एकोपा आणि तंदुरुस्तीचा संदेश देणार आहेत. कोल्हापूरातील शास्त्रीनगर मैदान येथे १४ ते १६ फेब्रुवारी या कालावधीत 'मंदिर प्रीमियर लीग' या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. तीन दिवस रंगणारी ही स्पर्धा डे-नाईट पद्धतीने खेळवण्यात येणार असून प्रकाशझोतात सामने रंगणार आहेत.

राज्यातील विविध देवस्थानांमधील पुजारी तसेच कर्मचारी या स्पर्धेत सहभागी होणार असल्याने या उपक्रमाला वेगळेच वलय प्राप्त झाले आहे. स्पर्धा समितीचे अध्यक्ष मकरंद मुनीश्वर यांनी पत्रकार परिषदेत माहिती देताना सांगितले की, "पुजारी बांधवांमध्ये परस्पर संवाद वाढावा, मैत्री दृढ व्हावी आणि क्रीडेमुळे आरोग्यदायी जीवनशैलीला चालना मिळावी, हा या स्पर्धेचा प्रमुख उद्देश आहे." त्यांनी सांगितले की, स्पर्धेची तयारी जोरात सुरू असून विविध संघांनी सरावालाही सुरुवात केली आहे.

स्पर्धेमध्ये विजेता, उपविजेता आणि तृतीय क्रमांकासाठी आकर्षक पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. प्रथम क्रमांकासाठी २५,५५५ रुपये, द्वितीय क्रमांकासाठी २१,१११ रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी १५,५५५ रुपये अशी रोख बक्षिसे जाहीर करण्यात आली आहेत. याशिवाय विजेता, उपविजेता व तृतीय क्रमांक चषक प्रदान करण्यात येणार आहेत. तसेच मालिकावीर, उत्कृष्ट फलंदाज, उत्कृष्ट गोलंदाज, शिस्तबद्ध संघ, सामनावीर आदी विशेष पारितोषिकांनी खेळाडूंचा गौरव करण्यात येणार आहे.

स्पर्धेचे उद्घाटन १४ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी अमोल येडगे, महापौर रुपाराणी निकम आणि उपमहापौर अक्षय जरग यांच्या हस्ते होणार आहे. या वेळी विविध मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. पत्रकार परिषदेस उपाध्यक्ष लाभेश मुनीश्वर, सचिव मयूर मुनीश्वर, कार्याध्यक्ष विनायक चव्हाण, सदस्य चैतन्य अष्टेकर, रोहन दातार, अमित दिवाण, शरद मुनीश्वर यांच्यासह सर्व समिती सदस्य उपस्थित होते.

धार्मिक परंपरा आणि क्रीडा यांची सांगड घालणारा हा अनोखा उपक्रम केवळ स्पर्धा नसून समाजाला सकारात्मक संदेश देणारा सोहळा ठरणार आहे. पुजारी बांधवांच्या या क्रिकेट महोत्सवाकडे कोल्हापूरकरांसह राज्यभरातील क्रीडाप्रेमींचे लक्ष लागले आहे.

### स्पर्धेमध्ये सहभागी होणारे संघ

१ श्री क्षेत्र जोतिबा, २) श्री क्षेत्र नृसिंहवाडी, ३) श्री क्षेत्र अंबाबाई / महालक्ष्मी देवस्थान- अ , ४) ओढ्यावरचा गणपती (पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती),५) परशुराम सोशल फौंडेशन,६) श्री क्षेत्र तुळजापूर- अ ,७) श्री क्षेत्र तुळजापूर – ब, ८) श्री क्षेत्र पंढरपूर, ९) श्री क्षेत्र माहुरगड, १०) श्री क्षेत्र अंबाबाई / महालक्ष्मी देवस्थान – ब , ११) श्री क्षेत्र शिर्डी, १२) श्री महालक्ष्मी (सारसबाग, पुणे)

# राहुल गांधींची खासदारकी रद्द करा!

## निवडणूक लढण्यास बंदी घाला; भाजपा खासदाराचा लोकसभेत प्रस्ताव

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. राहुल गांधींनी संसदेत निराधार विधाने करून देशाची दिशाभूल केल्याचा गंभीर आरोप भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी केला आहे. राहुल गांधींचे संसदेचे सदस्यत्व त्वरित रद्द करण्यात यावे आणि त्यांच्यावर निवडणूक लढवण्यास कायमची बंदी घालण्यात यावी, अशी मागणी निशिकांत दुबे यांनी केली आहे.**





दुबे यांनी यासाठी लोकसभेत 'स्वतंत्र प्रस्ताव' (SUBSTANTIVE MOTION) सादर केला आहे. यामुळे सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

खासदार दुबे यांनी संसदेच्या बाहेर पीटीआय या वृत्तवाहिनीबरोबर संवाद साधताना ही माहिती दिली. 'देशाला धोका असणाऱ्या जॉर्ज सोरोस या शक्तींच्या मदतीने राहुल गांधी देशाची दिशाभूल करत आहेत. राहुल गांधी यांच्याविरोधात लोकसभेत प्रस्ताव मांडला आहे', अशी माहिती दुबे यांनी दिली. जॉर्ज सोरोस हे हंगेरियन-अमेरिकन अब्जाधीश गुंतवणूकदार आहेत. जॉर्ज यांनी जगभरात उदारमतवादी विचारांना पाठिंबा दिल्याचा आरोप उजव्या विचारसरणीच्या संघटना करतात.

### भारत-अमेरिका करारावरून राजकीय वादंग पेटला

आम्ही एखाद्या देशाकडून तेल खरेदी करु शकत नाही, असे अमेरिका सांगते त्यावेळी भारताची उर्जा सुरक्षा बाह्यशक्तीच्या हातात आहे असा त्याचा अर्थ होतो. देशाहिताबरोबर तडजोड करताना सरकारला लाज वाटायला हवी. अमेरिकेने भारतावरील २५ टक्के टॅरिफ कमी केले, त्यावेळी ट्रम्प यांनी भारताने रशियाकडून तेल खरेदी बंद करावी असे सांगितले. राहुल गांधी यांनी याचाच संदर्भ देऊन सभागृहात सरकारला धारेवर धरलं.

### हक्कभंग ऐवजी स्वतंत्र प्रस्ताव

राहुल गांधी यांनी लोकसभेत भाषण करताना केंद्र सरकारने डोनाल्ड ट्रम्प यांच्यासोबत करारात देश विकला, असा आरोप केला होता. यानंतर आक्रमक झालेल्या भाजपाने त्यांच्याविरोधात मांडलेल्या प्रस्तावामुळे सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील संघर्ष तीव्र होणार आहे. सभागृहात निराधार विधाने करून लोकसभेची दिशाभूल केल्याचा आरोप करत केंद्रीय संसदीय कार्यमंत्री किरण रिजिजू यांनी राहुल गांधींविरोधात 'हक्कभंग नोटीस' (BREACH OF PRIVILEGE) दाखल करण्याचे संकेत दिले होते. पण, दुबेंनी हक्कभंग ऐवजी 'स्वतंत्र प्रस्ताव' (SUBSTANTIVE MOTION) मांडण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रस्तावाद्वारे गंभीर विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा घडवून आणता येते.

# इम्रान खान यांची ८५ टक्के दृष्टी गेली; सुप्रीम कोर्टात माहिती

**महाईन्यूज । इस्लामाबाद**

**विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. राहुल गांधींनी संसदेत निराधार विधाने करून देशाची दिशाभूल केल्याचा गंभीर आरोप भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी केला आहे. राहुल गांधींचे संसदेचे सदस्यत्व त्वरित रद्द करण्यात यावे आणि त्यांच्यावर निवडणूक लढवण्यास कायमची बंदी घालण्यात यावी, अशी मागणी निशिकांत दुबे यांनी केली आहे.**



माजी पंतप्रधान आणि 'पीटीआय' पक्षाचे संस्थापक इम्रान खान यांच्या प्रकृतीबाबत समोर आलेल्या एका धक्कादायक वृत्ताने पाकिस्तानात खळबळ उडाली आहे. दीर्घकाळापासून रावळपिंडीतील अदियाला तुरुंगात बंदिस्त असलेल्या इम्रान खान यांच्या उजव्या डोळ्याची दृष्टी ८५ टक्क्यांपर्यंत निकामी झाली आहे, असा दावा त्यांच्या पक्षाच्या वतीने करण्यात आला आहे. पाकिस्तानच्या सर्वोच्च न्यायालयाने खान यांच्या डोळ्यांच्या तपासणीसाठी एक विशेष वैद्यकीय पथक स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत.

गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात इम्रान खान यांच्या तुरुंगातील स्थितीबाबत सुनावणी पार पडली. यावेळी सादर करण्यात आलेल्या एका अहवालात धक्कादायक माहिती समोर आली. ऑक्टोबर २०२५ पर्यंत खान यांची दृष्टी सामान्य होती, मात्र त्यानंतर त्यांना धूसर दिसू लागले. उपचारांमधील दिरंगाईमुळे ही स्थिती अधिक खालावली. तपासणीदरम्यान डोळ्यात रक्ताची गुठळी झाल्याचे निदान झाले. इंजेक्शनद्वारे उपचार करूनही त्यांची दृष्टी पूर्ववत होऊ शकलेली नाही, असा दावा त्यांच्या पक्षाच्या वतीने करण्यात आला आहे.

### पाकिस्तान सरकारने सर्व दावे फेटाळले

इम्रान खान यांनी वारंवार डोळ्यांच्या त्रासाची तक्रार करूनही तुरुंग प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप अहवालात करण्यात आला आहे. दुसरीकडे, पाकिस्तानचे माहिती मंत्री अताउल्लाह तरार यांनी मात्र खान यांच्या कुटुंबीयांकडून पसरवले जाणारे दावे खोटे असल्याचे म्हटले आहे.

### कैद्याला योग्य उपचार मिळणे सरकारची जबाबदारी

पाकिस्तानचे सरन्यायाधीश (CJP) याह्या आफ्रिदी आणि न्यायमूर्ती शाहिद बिलाल हसन यांच्या खंडपीठाने या प्रकरणावर सुनावणी घेतली. "कैद्याचे आरोग्य ही राज्याची सर्वोच्च प्राथमिकता आहे आणि त्याला योग्य उपचार मिळणे ही सरकारची जबाबदारी आहे," असे स्पष्ट मत सरन्यायाधीशांनी नोंदवले.

### इम्रान खान यांना मुलांशी फोनवर बोलण्याची परवानगी

न्यायालयाने केवळ वैद्यकीय उपचारांचेच नव्हे, तर इम्रान खान यांना त्यांच्या मुलांशी दूरध्वनीवरून संवाद साधण्याची परवानगी देण्याचेही निर्देश दिले आहेत. हे दोन्ही आदेश १६ फेब्रुवारीपूर्वी (सोमवार) अंमलात आणण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अटॉर्नी जनरल मन्सूर उस्मान अवान यांनी न्यायालयात ग्वाही दिली की, "वैद्यकीय सुविधा पुरवणे ही सरकारची जबाबदारी आहे आणि जर कैदी समाधानी नसेल, तर सरकार योग्य ती पावले उचलेल.



## करिना कपूरचा ब्लॅक ड्रेसमधील हटके लुक

प्रसिद्ध बॉलीवूड अभिनेत्री करीना कपूर खानने नुकतीच अभिनेत्री सोनम कपूरच्या बेबी शॉवरला हजेरी लावली. रविवारी, करिना देखील तिचा पती आणि अभिनेता सैफ अली खानसह मुंबईतील एका कार्यक्रमात दिसली. या पॉवर कपलने पूर्णपणे काळ्या रंगाचा लूक सेट केला होता. सैफ अली खानने काळ्या रंगाचा सूट आणि बूट घातले होते, तर करीनाने काळ्या रंगाचा ड्रेस घातला होता. मात्र, हा ड्रेस त्यांची जवळची मैत्रीण आणि अभिनेत्री मलायका अरोराचा असल्याची चर्चा आहे. करीना कपूर खान आणि मलायका अरोरा यांच्यात खास मैत्री आहे. या दोन्ही अभिनेत्री खूप जवळच्या आहेत. करीना आणि मलायका दोघीही फॅशन कॉन्शस आहेत. जेव्हा-जेव्हा त्या चाहत्यांमध्ये दिसतात तेव्हा त्यांच्या ड्रेसिंग सेन्सची चर्चा होते. अलीकडेच, जेव्हा करीना एका कार्यक्रमात गेली तेव्हा तिच्या काळ्या रंगाच्या ड्रेसची खूप चर्चा झाली. सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या व्हिडिओमध्ये, तुम्ही करीना तिचा पती सैफ अली खानसोबत हातात हात घालून चालताना पाहू शकता. पापाराझींनीही या जोडप्याला त्यांच्या कॅमेऱ्यात कैद केले आणि त्यांचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

## दीपिका फोटोशूटमुळे चर्चेत



बॉलीवूड अभिनेत्री दीपिका पादुकोण कोणत्या ना कोणत्या कारणामुळे सतत चर्चेत असते. दीपिका आठ तासांच्या शिफ्टच्या विधानामुळे चर्चेत आली होती. त्यानंतर अनेक अभिनेत्रींनी तिच्या मागणीला पाठिंबा देखील दर्शवला होता. याच मागणीमुळे ॲनिमल फेम दिग्दर्शकाच्या एका मोठ्या चित्रपटातून दीपिका बाहेर पडली. याशिवाय दीपिका सोशल मीडियावरील तिच्या फोटोमुळे चर्चेत असते. नुकतेच दीपिकाने नवीन फोटोशूटचे फोटो तिच्या इंस्टाग्रामवर शेअर केले आहेत. या फोटोंमधील ब्लॅक ड्रेसमध्ये दीपिका पादुकोणचा ग्लॅमरस अवतार पाहून फॅन्स फिदा झाले आहेत. या फोटोंमध्ये अभिनेत्रीचे सौंदर्य खुलून दिसत आहे. तिच्या या फोटोंने फॅन्सना वेड लावले आहे. कमेंट्समध्ये चाहत्यांकडून भरभरून प्रेम व्यक्त केले जात आहे. दीपिकाने शेअर केलेल्या लूकबद्दल बोलायचे झाले तर, दीपिकाने ब्लॅक बॉडीकॉन ड्रेस परिधान केला असून त्यामध्ये ती खूपच सुंदर दिसत आहे.

## खुशीचा हॉट अंदाज...

बोनी कपूरची मुलगी आणि जान्हवीची लहान बहीण खुशी तिच्या ग्लॅमरस स्टाईल आणि फॅशन सेन्सने चाहत्यांना वेड लावते. खुशीचा प्रत्येक लूक खूपच सुंदर आहे. २५ वर्षीय खुशी कपूरने तिच्या इंस्टाग्राम हँडलवर लाल आणि पांढऱ्या रंगाच्या बिकिनीमध्ये स्वतःचे काही आकर्षक फोटो शेअर केले आहेत, ज्यामुळे चाहत्यांना खूप आनंद झाला आहे. खुशीने बिकिनी टॉप आणि जॅकेट जोडले आहेत. अभिनेत्रीने बिकिनीचे बटण न लावता तिच्या जीन्सलाही स्टाईल अंदाजात परिधान केले आहे. खुशी कपूरच्या अनोख्या स्टाइल स्टेटमेंटने चाहते खूपच प्रभावित झाले आहेत. अभिनेत्रीने स्मोकी आय मेकअप आणि ग्लॉसी लिपस्टिकने लूक पूर्ण केला. केस उघडे ठेवून तिचा हॉट लूक दाखवत आहे. खुशीने वेगवेगळ्या पोझमध्ये पोज दिल्या आहेत, कधी बसून, कधी झोपून, तर कधी उभी राहून. प्रत्येक पोज अगदी किलर आहे.



## तमन्नाच्या 'रागिनी' ला विलंब होणार!

चित्रपट असो वा आयटम साँग सगळीकडेच आघाडीवर असलेली तमन्ना भाटिया हिची एकता कपूरच्या चित्रपटात एन्ट्री झाल्याचे सर्वांनाच माहीत आहे. 'रागिनी एमएमएस ३'मध्ये तमन्ना एका वेगळ्याच भूमिकेत प्रेक्षकांसमोर येणार आहे. तमन्नाच्या चाहत्यांना तिच्या या हॉरर फ्रँचायझीची प्रतीक्षा असताना 'रागिनी एमएमएस ३' स्थगित करण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. वेळापत्रकातील अडचणींमुळे 'रागिनी ३'चे दिग्दर्शक साहिर रझा बाहेर पडल्याने चित्रपट अर्ध्यावर लटकला आहे. साहिर एका वेब सिरीजचे शो-रनर असून, स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मकडून आलेल्या निर्देशांनुसार शो-रनरची दररोज सेटवर उपस्थिती अनिवार्य केल्याने 'रागिनी ३'च्या वेळापत्रकाशी जुळवाजुळव करणे कठीण झाले.



# भारत-पाक लढतीआधी भारताला धक्का; अभिषेक 'आऊट'

## सूर्यकुमार यादवने दिली फिटनेस अपडेट; नामिबियाविरुद्ध संजू सॅमसनला संधी

महाईन्यूज । दिल्ली

**आयसीसी टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत भारतीय संघ नामिबियाचा सामना करण्यासाठी मैदानात उतरला आहे. हा सामना भारतीय संघासाठी सराव सामन्यासारखाच असणार आहे. कारण येत्या १५ फेब्रुवारीला भारतीय संघाचा सामना कट्टर प्रतिस्पर्धी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पाकिस्तानविरूद्ध होणार आहे. या सामन्याआधी भारतीय संघाचं टेन्शन वाढलं आहे. भारताचा स्फोटक सलामीवीर फलंदाज अभिषेक शर्मा अजूनही पूर्णपणे फिट झालेला नाही.**




त्यामुळे त्याला नामिबियाविरूद्धच्या सामन्यात स्थान देण्यात आलेलं नाही. तर पाकिस्तानविरूद्ध होणाऱ्या सामन्यालाही तो मुकणार असल्याची माहिती कर्णधार सूर्यकुमार यादवने दिली आहे.

या सामन्यात नामिबियाच्या कर्णधाराने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. नाणेफेकीच्या वेळी बोलताना सूर्यकुमार यादव म्हणाला की, "आम्हालाही नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायची होती. आम्ही नाणेफेक गमावतोय, पण सामने जिंकतोय त्यामुळे काही समस्या नाही. दुसऱ्या डावात ड्यू असू शकतो. पण जेव्हा, धावांचा पाठलाग करतो तेव्हा आत्मविश्वास वाढतो. अभिषेक अजूनही पूर्णपणे फिट झालेला नाही. तो एक- दोन सामन्यांना मुकणार आहे. त्याच्या जागी संजू सॅमसनचा संघात समावेश करण्यात आला आहे. संजू सॅमसन देखील आक्रमक फलंदाज आहे. तर सिराजच्या जागी बुमराहला संधी देण्यात आली आहे."

अभिषेक शर्मा अमेरिकेविरूद्ध झालेल्या सामन्यात खेळताना दिसून आला होता. या सामन्यात तो शून्यावर माघारी परतला होता. त्यानंतर आजारी असल्यामुळे त्याला रूग्णालयात भरती करण्यात आलं होतं. तो नामिबियाविरूद्धच्या सामन्यात खेळणार नाही, हे आधीच स्पष्ट झालं होतं. पण पाकिस्तानविरूद्धच्या सामन्यातूनी बाहेर होणं, हा भारतीय संघासाठी मोठा धक्का आहे. कारण हा सामना भारतीय संघासाठी अतिशय महत्वाचा सामना असणार आहे. या सामन्यात तो भारतीय संघासाठी एक्स फॅक्टर ठरू शकतो. आता संजू सॅमसन त्याची जागा भरून काढून चांगली सुरूवात करून देणार का? हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

# ६ षटकांत ८६ धावा; वर्ल्डकपमध्ये भारताचा पराक्रम

महाईन्यूज । दिल्ली




**भारतीय संघ आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेत नामिबियाविरूद्ध आपला दुसरा सामना खेळण्यासाठी मैदानात उतरला आहे. दिल्लीतील अरूण जेटली स्टेडियमवर सुरू असलेल्या या सामन्यात नामिबियाच्या कर्णधाराने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या भारतीय फलंदाजांनी सुरूवातीच्या काही षटकांमध्ये धावांचा पाऊस पाडला. दरम्यान पॉवरप्लेमध्ये फलंदाजी करताना भारतीय संघाने असं काही केलं आहे, जे याआधी कधीच घडलं नव्हतं.**




या सामन्यात नामिबियाच्या कर्णधाराने नाणेफेक जिंकून भारतीय संघाला प्रथम फलंदाजी करण्याचं आमंत्रण दिलं. भारतीय संघाला देखील नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायची होती, असं सूर्यकुमार यादव म्हणाला. त्यामुळे भारतीय फलंदाजांकडे मोठी धावसंख्या उभारण्याची संधी होती. या सामन्यात अभिषेक शर्माला विश्रांती देण्यात आली आहे. त्याच्या जागी संजू सॅमसन इशान किशनसोबत डावाची सुरूवात करण्यासाठी मैदानात आला. टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत आपला पहिलाच सामना खेळत असलेल्या संजू सॅमसनने षटकार मारून आपल्या टी-२० वर्ल्डकप कारकिर्दीची सुरूवात केली. त्यानंतर त्याने आणखी काही मोठे फटके मारले. पण तो २२ धावा करून माघारी परतला.

संजू सॅमसन बाद झाल्यानंतर इशान किशनने नामिबियाच्या गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली. पॉवरप्लेच्या षटकांमध्ये फलंदाजी करताना इशान किशन आणि तिलक वर्मा यांनी दमदार पॉवर हिंटीग केली. दोघांनी मिळून पॉवरप्लेमध्ये भारतीय संघाची धावसंख्या ६ षटकात १ गडी बाद ८६ धावांवर पोहोचवली. ही भारतीय संघाची टी-२० वर्ल्डकप स्पर्धेच्या इतिहासातील पॉवरप्लेमध्ये उभारलेली सर्वोच्च धावसंख्या आहे. तर एकूण स्पर्धेतील चौथी सर्वोच्च धावसंख्या आहे.

टी-२० वर्ल्डकप स्पर्धेच्या इतिहासात पॉवरप्लेमध्ये फलंदाजी करताना सर्वोच्च धावसंख्या उभारण्याचा रेकॉर्ड हा वेस्ट इंडिजच्या नावावर आहे. वेस्ट इंडिजने २०२४ मध्ये झालेल्या टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत अफगाणिस्तानविरूद्ध खेळताना १ गडी बाद ९२ धावा केल्या होत्या. तर २०१४ मध्ये झालेल्या टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत नेदरलँडने आयर्लंडविरूद्ध खेळताना १ गडी बाद ९१ धावा केल्या होत्या. २०१६ मध्ये झालेल्या टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत दक्षिण आफ्रिकेविरूद्ध झालेल्या सामन्यात खेळताना इंग्लंडने ३ गडी बाद ८९ धावा केल्या होत्या. आता भारतीय संघाने नामिबियाविरूद्ध खेळताना १ गडी बाद ८६ धावा केल्या आहेत.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। शुक्रवार ।
दि. 13 फेब्रुवारी 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## निगडी येथे एकदिवसीय शांततामय आंदोलन; शासनाला निवेदन सादर

# कामगार-विरोधी चार नवे कामगार कायदे तात्काळ रद्द करा : इंटकची मागणी...

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**राष्ट्रीय मजदूर कॉंग्रेस (इंटक)च्या वतीने आज निगडी येथील मा. अप्पर तहसीलदार कार्यालयासमोर विविध प्रलंबित मागण्यांसाठी एकदिवसीय शांततामय व गांधीवादी आंदोलन करण्यात आले. केंद्र शासनाने कोणतीही पूर्व चर्चा न करता लागू केलेल्या चार नवीन कामगार संहितांच्या निषेधार्थ तसेच कामगारविरोधी धोरणे मागे घेण्याच्या मागणीसाठी हे आंदोलन आयोजित करण्यात आले होते.**




“केंद्र शासनाने लागू केलेल्या नव्या कामगार संहितांमुळे कामगारांचे विद्यमान हक्क कमी होत असून कंत्राटीकरण आणि खासगीकरणाला मोठ्या प्रमाणावर चालना मिळत आहे. रोजगाराची सुरक्षितता धोक्यात येत असताना शासनाने कामगार संघटनांशी सखोल चर्चा न करता घेतलेले निर्णय अन्यायकारक आहेत. कामगार, कर्मचारी आणि सर्वसामान्य जनतेच्या हक्कांसाठी आम्ही लोकशाही व संविधानिक मार्गाने लढा सुरू ठेवणार आहोत. शासनाने आमच्या मागण्यांची तात्काळ दखल घ्यावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा आम्ही देत आहोत.

–**डॉ. कैलास कदम,** प्रदेशाध्यक्ष, इंटक.

या आंदोलनात विविध कामगार व कर्मचारी संघटनांसह आशा, अंगणवाडी, एमडीएम, एनएचएम कर्मचारी तसेच इतर क्षेत्रांतील कामगार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. निदर्शने व घोषणाबाजी करत शासनाचे लक्ष वेधण्यात आले. त्यानंतर मा. अप्पर तहसीलदार यांना निवेदन सादर करून मागण्या शासनापर्यंत पोहोचविण्यात आल्या.

यावेळी मनोहर गडेकर, शितल कोतवाल, मयुर दाभाडे, गिरीष मेंगे, राजेंद्र खराडे, नुरुद्दीन इनामदार, विजय जाधव, गायत्री सोनार, शशिकांत धुमाळ, सुनील देसाई, यशवंत सुपेकर, शांताराम कदम, भारती घाग, सुनीता जाधव, सुवर्णा कदम, बबिता ससाणे, संतोष हरळ, कुमार मारणे, हमीद इनामदार, विश्वास काशिद, श्रद्धा कचरे कोद्रे, संतोष खेडेकर, गोरख जगताप, विकास साखरे, संतोष पवार, नवनाथ नाईकनवरे, किरण भुजबळ, किशोर पाटील, राजेश पातोंड, विठ्ठल गुंडाळ, विजय मोकळे, सोपान बारबद्दे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प्रमुख मागण्या

1. चार नवीन कामगार संहिता तात्काळ रद्द कराव्यात
2. बियाणे विधेयक व वीज दुरुस्ती विधेयक मागे घ्यावेत
3. अणुऊर्जा क्षेत्रातील खाजगीकरणास प्रोत्साहन देणारी धोरणे रद्द करावीत
4. मनरेगा योजना बळकट करावी व संबंधित ग्रामीण कायदे मागे घ्यावेत
5. रोजगार व विमा क्षेत्रातील १०० टक्के थेट परकीय गुंतवणूक निर्णय मागे घ्यावा
6. ‘विकसित भारत शिक्षा अधिष्ठान विधेयक २०२५’ मागे घ्यावे
7. सरकारी व सार्वजनिक क्षेत्रातील रिक्त पदे तात्काळ भरावीत
8. अंगणवाडी, आशा, एमडीएम कर्मचाऱ्यांना नियमित करून सरकारी कर्मचारी दर्जा द्यावा
9. एनएचएम डॉक्टर व कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवा द्यावी

# ५ लाखांहून अधिक मालमत्ताधारकांनी वेळेत भरला मालमत्ता कर

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीत चालू आर्थिक वर्षात मालमत्ता कर भरण्याबाबत नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. शहरात सुमारे ७ लाख ३२ हजार ३०२ मिळकतींची नोंद असून, त्यापैकी ५ लाख २६ हजार २२६ मालमत्ताधारकांनी आतापर्यंत मालमत्ता कराचा भरणा केला आहे. तर अद्याप २ लाख ६ हजार ७६ मालमत्ताधारकांनी मालमत्ता कराचा भरणा केलेला नाही, अशी माहिती कर आकारणी व कर संकलन विभागाचे उपायुक्त सचिन पवार यांनी दिली.**




ज्या मालमत्ताधारकांनी अद्याप मालमत्ता कराचा भरणा केलेला नाही, त्यांनी तातडीने कर भरावा. महापालिकेने कर भरण्यासाठी सुलभ आणि विविध माध्यमे उपलब्ध करून दिली आहेत. वेळेत कर भरल्यास विलंब दंड तसेच जप्ती अथवा इतर कारवाई टाळता येईल. नागरिकांच्या सोयीसाठी शहरातील १८ विभागीय कर संकलन कार्यालये शनिवार, रविवार तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही सुरू ठेवण्यात आली आहेत.

– **रवि लांडगे,** महापौर, पिंपरी चिंचवड महापालिका.

पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीत चालू आर्थिक वर्षात मालमत्ता कर भरण्याबाबत नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. शहरात सुमारे ७ लाख ३२ हजार ३०२ मिळकतींची नोंद असून, त्यापैकी ५ लाख २६ हजार २२६ मालमत्ताधारकांनी आतापर्यंत मालमत्ता कराचा भरणा केला आहे. तर अद्याप २ लाख ६ हजार ७६ मालमत्ताधारकांनी मालमत्ता कराचा भरणा केलेला नाही, अशी माहिती कर आकारणी व कर संकलन विभागाचे उपायुक्त सचिन पवार यांनी दिली.

# चिंचवडच्या वीजसमस्येसाठी 'ॲक्शन प्लॅन'

## आमदार शंकर जगताप यांची 'डीपीडीसी'त निधीची मागणी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**चिंचवड मतदारसंघात येणाऱ्या जुनी सांगवी परिसरातील वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्याच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी आमदार शंकर जगताप यांनी पुढाकार घेतला आहे. गुरुवारी झालेल्या पुणे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये आग्रही भूमिका घेत त्यांनी एनसीएल पाषाण उपकेंद्र ते महावितरणच्या औंध कर्मचारी वसाहतीपर्यंत उच्च क्षमतेची (२२ के.व्ही.३०० स्क्वेअर मिमी) नवीन वीज वाहिनी टाकण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी जोरदार मागणी आमदार शंकर जगताप यांनी केली. या मागणीला बैठकीत सकारात्मक प्रतिसाद मिळाला.**



पुणे जिल्हा नियोजन समितीची बैठक गुरुवारी पार पडली. या बैठकीमध्ये चिंचवड मतदार संघातील अनियमित वीजपुरवठ्यावरून आमदार शंकर जगताप यांनी आग्रही भूमिका घेतली. या बैठकीत बोलताना आमदार जगताप म्हणाले, चिंचवड मतदार संघातील जुनी सांगवी परिसरात अनेक ठिकाणी अखंडीत विद्युत प्रवाह होत असल्याने वीज ग्राहकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे. जुनी सांगवी परिसरात अनेक ठिकाणी व्होल्टेज चढ-उतार आणि केबल बिघाडाच्या घटना घडत असल्याने नागरिकांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागला. विशेषतः या भागातील पवार नगर परिसरात २७ जुलै २०२५ रोजी विद्युत प्रवाह अचानक वाढल्याने अनेक घरांतील टीव्ही, फ्रिज व इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे जळाल्याच्या घटना घडल्या होत्या. त्यामुळे नागरिकांचे आर्थिक नुकसान झाले.

या पार्श्वभूमीवर एनसीएल पाषाण उपकेंद्र ते महावितरणच्या औंध कर्मचारी वसाहतीपर्यंत (सुमारे २.५ किमी) २२ के.व्ही., ३०० स्क्वेअर मिमी क्षमतेची नवीन उच्च दर्जाची व सुरक्षित वीज वाहिनी टाकण्याची मागणी आमदार शंकर जगताप यांनी पुणे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत केली आहे. सद्यस्थितीत असलेली मुख्य केबल जुनी व तांत्रिकदृष्ट्या कमकुवत झाली असून अनेक ठिकाणी जॉइंट्स असल्यामुळे वारंवार बिघाड होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. नवीन उच्च क्षमतेची केबल टाकण्यात आल्यास वीज पुरवठा सुरळीत आणि योग्य दाबाने होईल. तसेच स्पार्किंग, आग किंवा जीवितहानीचा धोका टळून नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित होईल, असा विश्वास आमदार जगताप यांनी व्यक्त केला.

> चिंचवड मतदारसंघात येणाऱ्या "जुनी सांगवी परिसरातील वीज समस्येबाबत डीपीडीसी बैठकीत मांडलेल्या प्रस्तावाला सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. एनसीएल पाषाण उपकेंद्र ते औंध कर्मचारी वसाहत दरम्यान २२ के.व्ही. नवीन केबल टाकण्याच्या कामासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत प्रशासनाने सहकार्याची भूमिका दर्शवली आहे.हे काम लवकरच मार्गी लागणार असून , नागरिकांना अखंडित व सुरक्षित वीज पुरवठ्याचा दिलासा मिळणार आहे.
>
> **– शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा.**

# दर्शन कॉलनी-बंसल विहारमध्ये चेंबर लाईन कामाचा शुभारंभ

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिका प्रभाग क्रमांक ५ मधील दर्शन कॉलनी व बंसल विहार परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून भेडसावत असलेल्या ड्रेनेज समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी नवीन चेंबर लाईनच्या कामाचा शुभारंभ नगरसेविका कविता भोंगाळे यांच्या पुढाकाराने करण्यात आला.**





दर्शन कॉलनी व बंसल विहारमधील नागरिकांना ड्रेनेजच्या समस्येमुळे वारंवार अडचणींचा सामना करावा लागत होता. साचलेले पाणी, अस्वच्छता आणि दुर्गंधी यामुळे आरोग्याच्या समस्या निर्माण होत होत्या. ही बाब गांभीर्याने लक्षात घेऊन कविता भोंगाळे यांनी संबंधित विभागाकडे पाठपुरावा करत चेंबर लाईनचे काम मार्गी लावले.

यावेळी बोलताना कविता भोंगाळे यांनी सांगितले की, परिसरातील प्रत्येक नागरिकाला स्वच्छ, सुरक्षित आणि आरोग्यदायी वातावरण मिळणे आवश्यक आहे. ड्रेनेजसारख्या मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष होता कामा नये. नागरिकांच्या तक्रारींची दखल घेऊन हे काम हाती घेण्यात आले असून ते दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्यावर भर दिला जाणार आहे.

प्रभागातील पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, वीज आणि इतर मूलभूत सुविधांसाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असून विकासकामांना प्राधान्य दिले जात आहे.

नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शुभारंभ प्रसंगी नगरसेवक सागरभैय्या गवळी, जालिंदर बापू शिंदे, भीमाताई फुगे, महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी, स्थानिक पदाधिकारी तसेच नागरिक उपस्थित होते.

> "दर्शन कॉलनी व बंसल विहार परिसरातील ड्रेनेज समस्या ही केवळ तांत्रिक बाब नसून नागरिकांच्या आरोग्याशी आणि दैनंदिन जीवनाशी निगडित आहे. ही अडचण कायमस्वरूपी दूर व्हावी यासाठीच चेंबर लाईनचे काम प्राधान्याने हाती घेतले आहे. काम दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करून प्रत्येक कुटुंबाला स्वच्छ, सुरक्षित व आरोग्यदायी वातावरण मिळेल, यासाठी मी कटिबद्ध आहे. नागरिकांनी निश्चिंत राहावे, प्रभागातील प्रत्येक मूलभूत सुविधेसाठी सातत्याने पाठपुरावा सुरूच राहील.
>
> **– कविता भोंगाळे, नगरसेविका, प्रभाग-5.**

# Dr. Sushant Patil Group Karandak 2K26 Grand Finale Concludes with Grand Success

**MAHAENEWS I PUNE**

**The very first year of Dr. Sushant Patil Group Karandak 2K26 marked a historic and spectacular beginning, with more than 50 colleges from across Pune participating in this prestigious inter-college competition. The grand finale was a vibrant celebration of talent, creativity, and youthful energy.**






The event was organized with the aim of promoting student activities and providing a grand platform for diverse art forms including Dance, Singing, Live Band performances, and Fashion Show. The competition witnessed exceptionally talented performers, making it highly competitive and memorable. With the strong vision and continuous support of Dr. Sushant Patil Sir and Adv. Anuja Patil Ma'am, the Dr. Sushant Patil Group Karandak 2K26 was successfully organized and executed on a grand scale. The event was graced by the esteemed presence of Principal Dr. Suresh Mali, Principal Dr. Suresh Shirbhadurkar, Director Dr. Meghana Bhilare, and Mr. Pradip Khandve. Their encouragement and support added great value to the occasion. All Heads of Departments and Cultural Committees actively supported and motivated the students throughout the event. The highlight of the grand finale was the distinguished panel of judges. Versatile Singer and Composer Saurabh Salunke judged the Singing category. Actor and Model Peeya Kosumbkar judged the Fashion Show and Dance categories. The judge panel also included Actor and Director Alok Beske, Choreographer Hemant Pansare, and Choreographer Suchitra Mohanty, whose expertise and guidance elevated the standards of the competition. The event was anchored fabulously by Anchor Komal, who kept the audience engaged and energized throughout the program. The grand arrangements and flawless execution of the event were led by Creative and Cultural Director Prof. Shreyas Deshpande along with Unmesh Korde, Tanmay Muttalwar, Mangesh Dhole, Sidhhu Jadhav, Bhavana Shinde, Sarika Patil, Shweta Padale, Shruti Ingole, Jay Patole, Raju Pasalkar and the dedicated Student Council members who worked tirelessly to make the event a remarkable success. All winners and runner-ups expressed immense joy and appreciation. Even the participating contestants shared positive and encouraging feedback about the overall organization and experience of the event. Dr. Sushant Patil Group Karandak 2K26 has set a new benchmark for inter-college cultural competitions in Pune and promises an even bigger celebration in the coming years.

# Waste Segregation Awareness at Priyadarshini School

**MAHAENEWS I PIMPRI**

**Priyadarshini School, Moshi, in collaboration with the Pimpri-Chinchwad Municipal Corporation (PCMC), successfully organized an awareness session on the topic "Waste Segregation and the Ill Effects of Uncleanliness." The initiative was aimed at educating students about the importance of cleanliness, public health, and scientific waste management practices, while fostering a sense of environmental responsibility from a young age.**



During the session, resource persons from PCMC provided detailed guidance on the importance of segregating wet and dry waste at the source. They explained practical methods of waste segregation, recycling processes, composting of organic waste, and the role of citizens in maintaining a sustainable and hygienic city. The experts also elaborated on the serious health risks associated with improper waste disposal, including the spread of infectious diseases, air and water pollution, and long-term environmental damage.

Interactive discussions and real-life examples were used to make the session engaging and impactful for students. The speakers emphasized that small daily habits—such as using separate bins for wet and dry waste, avoiding littering, and reducing plastic usage—can collectively bring significant positive change in society. Students were encouraged to act as "Cleanliness Ambassadors" in their homes and communities.

The program sought to instill civic responsibility, social commitment, and environmental awareness among students, empowering them to contribute actively to the Swachh Bharat and sustainable city initiatives. Teachers, students, and school staff enthusiastically participated in the session, making it both informative and successful.

The school management expressed sincere gratitude to the Pimpri-Chinchwad Municipal Corporation for their valuable cooperation and guidance. The Principal and faculty members appreciated the efforts of the experts and applauded the active participation of students, marking the event as a meaningful step toward building a cleaner and healthier community.

# नागरी केंद्रीत विकास साधण्यावर भर!

## महापालिकेत २०२६-२७ अंदाजपत्रक आढावा बैठक

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**अंदाजपत्रक तयार करताना आर्थिक परिस्थिती, पारदर्शकता आणि परिणामकारकता यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. विविध विभागांनी नागरिकांच्या दैनंदिन गरजा लक्षात घेऊन नियोजन करावे. नागरी केंद्रित विकास हा महापालिकेच्या कामकाजाचा केंद्रबिंदू राहील आणि त्या दृष्टीने सर्व विकासकामे गुणवत्तापूर्ण व वेळेत पूर्ण करण्यावर भर दिला जाईल. तसेच यामध्ये उपलब्ध संसाधनांचा योग्य व कार्यक्षम वापर करून नागरिकांना अधिक सक्षम व दर्जेदार सुविधा देताना लोकप्रतिनिधींचे सहकार्य देखील प्रशासनाला लाभणार आहे, असे मत आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी व्यक्त केले.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकाचा आढावा घेण्यासाठी दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृह येथे आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी आयोजित केलेल्या अधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस महापौर रवि लांडगे आणि सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे हे उपस्थित होते.

तसेच बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, विक्रांत बगाडे, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रविण जैन, नगरसचिव मुकेश कोळप, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, मुख्य आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, सहशहर अभियंता अजय सुर्यवंशी, मनोज सेटीया, उप आयुक्त अण्णा बोदडे, संदीप खोत, चेतना केरूरे, व्यंकटेश दुर्वास, ममता शिंदे, पंकज पाटील, राजेश आगळे, सहाय्यक आयुक्त अमित पंडीत, सिताराम बहुरे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह संबंधित विभागांचे विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### दीर्घकालीन विकासाच्या आराखड्यावर भर

बैठकीत आगामी वर्षासाठी महसुलवाढ, करसंकलन कार्यक्षमता, आरोग्य व वैद्यकीय क्षेत्रातील गुंतवणूक, पर्यावरणीय संतुलन राखणारे प्रकल्प, क्रीडा सुविधा विकास, तसेच शहरातील पाणीपुरवठा व्यवस्था अधिक सक्षम करण्याबाबत व्यापक चर्चा झाली. तसेच अंतिम टप्प्यातील विकासकामे वेळेत पूर्ण करण्यासाठी विभागनिहाय जबाबदाऱ्या निश्चित करण्याचे निर्देश देण्यात आले. नव्याने प्रस्तावित प्रकल्प राबविताना आर्थिक शाश्वतता आणि नागरिकहित हा मूलभूत निकष ठेवण्यावर भर देण्यात आला. महानगरपालिकेचे २०२६-२७ चे अंदाजपत्रक हे केवळ महसुली दस्तऐवज न राहता, शहराच्या सर्वांगीण आणि नागरिकाभिमुख विकासाचा आराखडा ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.




"शहराचा विकास हा नागरिकांच्या जीवनमानाशी थेट जोडलेला आहे. नागरी केंद्रित विकास साधायचा असेल तर प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यात प्रभावी समन्वय आवश्यक आहे. अंतिम टप्प्यातील कामे प्राधान्याने पूर्ण करून नागरिकांना त्याचा लाभ मिळाला पाहिजे. वाढती लोकसंख्या लक्षात घेता पाणीपुरवठा, आरोग्य व वैद्यकीय सुविधा बळकट करणे अत्यावश्यक आहे. पर्यावरण, आरोग्य, क्रीडा आणि वैद्यकीय सेवा या मुख्य क्षेत्रांवर भरीव तरतूद करून प्रत्येक घटकापर्यंत सुविधा पोहोचतील, याची हमी देणारे अंदाजपत्रक सादर करणे गरजेचे असून सर्वसामान्य नागरिकांचे समाधान हेच प्रशासन व लोकप्रतिनिधी यांचे अंतिम ध्येय असावे.

– रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

"नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडविण्यासाठी व नागरी सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी नियोजन आवश्यक आहे. लोकप्रतिनिधींचा प्रशासनात सहभाग आहे, त्यामुळे अधिकाऱ्यांनी सर्वांना विश्वासात घेऊन समन्वयातून काम करावे. शहराचा विकास करताना पायाभूत सुविधा अधिक बळकट करण्यावर भर दिला पाहिजे आणि त्या अनुषंगाने अंदाजपत्रकात ठोस तरतूद असावी. शासनस्तरावरून आवश्यक त्या बाबी पूर्ण करण्यासाठी आम्ही प्रयत्न करू. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्या संयुक्त सहभागातूनच प्रत्येक नागरिकापर्यंत सेवा प्रभावीपणे पोहोचू शकतील.

– प्रशांत शितोळे, सत्तारूढ पक्षनेते, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.




### आर्थिक स्थितीचा सखोल आढावा

बैठकीदरम्यान मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रविण जैन यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीचा तपशीलवार आढावा सादर केला. यामध्ये सर्वसाधारण निधीची तरतूद, विविध बँकांमधील मुदत ठेवी, विद्यमान कर्जाची स्थिती, मागील चार वर्षांतील जमा खर्च, मासिक महसुली खर्चाची आवश्यकता, अस्थायी अस्थापनेवरील कर्मचाऱ्यांची संख्या व त्यांना देण्यात येणारे मानधन, दायित्व निधी, मुद्रांक शुल्क व अन्य उत्पन्नाचा गोषवारा तसेच करसंकलन विभागाची मागील तीन वर्षांची आणि चालू वर्षातील कामगिरी यांचा समावेश होता. यासोबतच विविध विभागांना प्रस्तावित निधीची तरतूद, अंतिम टप्प्यात असलेली विकासकामे आणि नव्याने सुरू करण्यात येणाऱ्या प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला.